International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 15 January – February - 2026

# सोलापूर जिल्ह्यातील श्री. संत ज्ञानेश्वर महाराज पालखी राष्ट्रीय महामार्ग येथील भूसंपादन केलेल्या शेतकऱ्यांचा परिस्थितीचा अभ्यास

**डॉ. अनिल विजय शिरतोडे[1], महेश मोहन निचळ[2], प्राचार्य एकनाथ दिवेकर[3]**

*[2]पीएच डी.संशोधक विद्यार्थी,*

*प्रा.रामकृष्ण मोरे काका, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आकुर्डी, पुणे.*

*Corresponding Author - डॉ. अनिल विजय शिरतोडे*

**DOI - 10.5281/zenodo.18922803**

**गोषवारा:**

*प्रस्तुत संशोधन लेखात सोलापूर जिल्ह्यातील भूसंपादन क्र.11 या द्वारे जमिनीचे भूसंपादन केलेल्या शेतकऱ्यांचा परीस्थितीचा तुलनात्मक अभ्यास करण्यात आला आहे. या अभ्यासाचा मुख्य उद्देश प्रकल्प राबविणे व त्यांच्या सध्याची परीस्थितीचा तुलनात्मक अभ्यास करून तपासणे हा आहे. जिल्ह्यातील 13 तालुक्यामधील भूसंपादन प्रकल्प पूर्ण झाले किंवा अपूर्ण त्यातील फरक म्हणून श्री.संत ज्ञानेश्वर राष्ट्रीय महामार्ग व इतर प्रकल्पामधील लक्षणीय फरक आठवून येतो.भूसंपादन क्र 11 ऑफिस मधील (प्रांत ऑफिस) माहिती हि दुय्यम माहिती स्त्रोतांवर आधारित हा अभ्यास भूसंपादन केलेल्या हा राष्ट्रीय महामार्गावरून शेतकऱ्यांच्या परीस्थितीचा तुलनात्मक अभ्यास करून मांडता येईल.*

**प्रस्तावना:**

सोलापूर जिल्ह्यात कलेक्टर हा भूसंपादन मंडळ यांचा अध्यक्ष असतो व तो विविध प्रकारे शेतकऱ्याचा जमिनीचे भूसंपादन करून जिल्ह्याचा, देशाचा विकास होण्यासाठी, रेल्वे, रस्ते,बंधारे याद्वारे भूसंपादन करून प्रकल्प राबवविला जातो. जिल्ह्यातील प्रांत ऑफिस म्हणजे व भूसंपादन करतेवेळी शेतकऱ्यांना मिळणारा मोबदला हा शासकीय रेडीरेकनरचा दर किंवा खाजगी वाटाघाटीने त्याना मोबदला देण्याचे धोरण शासन राबवीत असते.ज्याने करून भूसंपादन करतेवेळी अडचण येऊ नये. सोलापूर जिल्ह्यात एकूण 13 तालुके आहेत. त्या तालुक्यांमध्ये भूसंपादन क्र 1,2,3,5,7,9,11 या क्रमांकाची ऑफिस तालुकावाईज दिले गेले आहेत. या ऑफिसात शेतकऱ्यांच्या जमिनीचे भूसम्पादन करून त्याना मोबदला देण्याचे काम हि करते. भू संपादन करतेवेळी शेतकऱ्यांची पहिली व सध्याची परिस्थितीचा तुलनात्मक अभ्यास करून त्या शेतकऱ्यांच्या कौटुंबिक यावर उपाययोजना सुचविणे हा आहे.

**संशेधानाची उद्दिष्टे:**

1. सोलापूर जिल्ह्यातील महामार्ग यांच्या प्रकल्पांची संख्या अभ्यासणे.
2. श्री.संत ज्ञानेश्वर महामार्ग भूसंपादन झालेल्या शेतकऱ्यांच्या पहिली व सध्याची परिस्थितीचे विश्लेषण.
3. भूसंपादन झालेल्या शेतकरी व इतर गावांतील शेतकरी यांची तुलना.
4. भूसंपादन प्रकल्प पूर्ण झाल्यावरती त्यांच्या कौटुंबिक परिस्थितीचा फरक शोधून उपाय सुचविणे.

**गृहीतके:**

1. सोलापूर जिल्ह्यातील पूर्ण झालेले प्रकल्पांची संख्या व अपूर्ण झालेल्या सकारात्मक संबंध आहे .
2. सोलापूर जिल्ह्यातील भूसंपादन प्रकल्पांच्या आकडेवारीत लक्षणीय प्रमाणात बदलते.
3. प्रकल्प पूर्ण झाल्यास सर्वच शेतकऱ्यांना मोबदला मिळत असतो.

**संशोधन पद्धती:**

**तथ्य संकलन**:

हा अभ्यास पूर्णतः दुय्यम माहितीवर आधारित आहे. जिल्ह्यातील प्रांत ऑफिस सोलापूर जिल्हा या ऑफिसद्वारे त्यांच्या दिलेल्या माहितीचा उपयोग करून त्यांचा अभ्यास करण्यात आला आहे . आकडेवारीचा उपयोग करून परिस्थितीचा तुलनात्मक दिलेल्या माहितीचा उपयोग करून त्यांचा अभ्यास करण्यात आला आहे . आकडेवारीचा उपयोग करून परिस्थितीचा तुलनात्मक परिस्थितीचा तुलनात्मक अभ्यास करण्यात आला आहे.

**तथ्य विश्लेषण:**

**१. वर्णनात्मक विश्लेषण:**

प्रस्तुत संशोधनामध्ये सोलापूर जिल्ह्यातील श्री. संत ज्ञानेश्वर राष्ट्रीय महामार्ग या प्रकल्पांची माहितीची संकलन करून शेतकऱ्यांचा परिस्थितीचा तुलनात्मक अभ्यास करण्यात आला आहे.

**२. तुलनात्मक विश्लेषण:**

आलेखाच्या सहाय्याने परिस्थितीती दर्शविण्यात आली आहे.


**३. सांख्यिकीय साधने:**

तथ्य विश्लेषणासाठी आणि सांख्यिकीय गणनासाठी टक्केवारी या गणितीय साधनांचा वापर करण्यात आला आहे.

**मर्यादा:**

प्रस्तुत संशोधन हे पूर्णपणे दुय्यम स्त्रोतांवर अवलंबून असून सदर संशोधनामध्ये केवळ प्रांत ऑफिस माळशिरस विभाग अकलूज या ऑफिस कडील माहितीचा वापर करण्यात आला आहे.

| अक्र. | ए.गा.सं | एकूण निवाडा रक्कम मंजूर | एकुण हेक्टर क्षेत्र | एकुण निवाडा रकम | एकूण वाटप रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | 13 | 126 | 120.32 | 338.2 | 293.75 |



तक्ता क्र. 1 व आलेख 1 नुसार सोलापुर जिल्ह्यातील श्री.संत ज्ञानेश्वर राष्ट्रीय महामार्ग या प्रकल्पांचा आढावा पुढीलप्रमाणे –

श्री.संत ज्ञानेश्वर पालखी महामार्गासाठी एकूण माळशिरस, अकलूज, पंढरपूर या तालुक्यातील 13 गावाचा समावेश करून तेथील शेतकऱ्यांच्या जमिनी भूसंपादन केल्या

गेल्या त्यात आत्तापर्यंत 126 करून त्यातील 120.20 हेक्टर आर जमिनीचे भूससंपादन करण्यात आले असून त्या शेतकऱ्यांच्या गेलेल्या जमिनीचा मोबदला म्हणून 338.2 कोटी रुपयांचा निवडा रक्कम मंजूर केले त्यातून आत्तापर्यंत 310.99 कोटी रुपयेच प्राप्त झाले असून तेथील 293.75 कोटी रुपये वाटप करण्यात आले असून तेथील शेतकार्यांना त्यांच्या जिमिनीचा मोबदला देण्यात आला आहे.

**निष्कर्ष:**

वरील आकडेवारीवरून असे स्पष्ट होते कि, सोलापूर जिल्ह्यातील शासनाने भूसंपादन केलेल्या श्री.संत ज्ञानेश्वर पालखी मार्ग व इतर राज्यातील केलेय भूसंपादन प्रकल्पाचे स्पष्ट भिन्नता आढळते.

श्री.संत ज्ञानेश्वर महाराज पालखीसाठी जेवढे क्षेत्र भूसंपादन केलेले आहे. त्यातील सर्वच शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा मोबदला देण्यात आला आहे.

तेथील शेतकऱ्यांच्या आर्थिक उत्पन्नात वाढ झालेली दिसून येत आहे. शेतकऱ्यांच्या या मिळालेल्या मोबदला वरून त्यांनी प्रत्येक घर बांधलेले आढळून येते. सामाजिक जीवनात त्यांचे राहणीमान उंच दिसून येत आहे.

एकंदर या वरून असे स्पष्ट होते कि, य प्रकल्पांमुळे शेतकऱ्यांची परिस्थिती बळकट झालेली दिसून येते.

**संदर्भ:**

1. आगलावे प्रदीप 'सामाजिक संशोधन,पद्धतीशास्त्र व तंत्रे'
2. उपजिल्हाधिकारी क्र 11 यांचेकडील प्राप्त माहिती.
3. https:/.www.solapurcollector.org/.